# कार्ल मार्क्सचा भांडवलवादी सिध्दांत

**प्रा.डॉ. तवार ए.टी.**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख**
**ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी**
**सहा.प्रा. मडावी ए.डी.**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख**
**आदर्श महाविद्यालय, हिंगोली**

**प्रस्तावना—**

सनातनवादा विरोधी आर्थिक विचारांचा नेता आणि क्रांतीकारक अशा नवीनच आर्थिक विचारांचा निर्माता व जगातील प्रस्थापित अशा सर्व गोष्टींना धक्का देणाऱ्या संप्रदायाचा जनक इत्यादी दृष्टीने कार्ल मार्क्सचे स्थान केवळ अर्थशास्त्रातच नाही तर जगाच्या इतिहासात अजरामर झाले आहे. कार्ल मार्क्सचे आर्थिक विचार अधिक व्यापक स्वरूपाचे असून ते केवळ अर्थशास्त्रीय स्वरूपाचे नाहीत तर इतिहास व सामाजिक उत्क्रांतीशी सुध्दा संबंधीत आहेत. कार्ल मार्क्सचा जन्म १८१८ साली जर्मनीत झाला. सन १८८३ साली कार्ल मार्क्सचा मृत्यू झाला. कार्ल मार्क्सने आपला सुप्रसिध्द "दास कॅपिटल" (Das Capital) या ग्रंथाचा पहिला खंड सन १८६७ साली प्रसिध्द केला. या ग्रंथाचे बाकीचे दोन खंड मार्क्सच्या मृत्यूनंतर सन १८८५ व १८९४ साली त्यांचा जिवलग मित्र एंगेल्स यांनी संपादन करून प्रसिध्द केले. "दास कॅपिटल" या ग्रंथामुळे जगाच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्थेत एक वेगळी कलाटणी मिळाली. सन १९१७ ची रशियन क्रांती तसेच सन १९४९ मध्ये चीनमध्ये घडून आलेली क्रांती, हे मार्क्सच्या आर्थिक विचारांचा परिणाम होय. सन १८४८ साली कार्ल मार्क्स आणि एंगेल्स या दोघांनी मिळून "साम्यवादी जाहिरनामा" (Communist Manifesto) लिहून प्रसिध्द केला. सन १९१७ ते १९९० या कालखंडात जगातील निम्मी लोकसंख्या साम्यवादी व्यवस्थेखाली होती. रशिया, चीन, मंगोलीया, क्यूबा आणि पूर्व युरोपातील अनेक देश यांनी साम्यवादी विचारसरणीचा आधार घेवून आपली आर्थिक धोरणे आखली.

१९ व्या शतकातील प्रमुख अर्थशास्त्र म्हणून कार्ल मार्क्स जगप्रसिध्द आहे. कार्ल मार्क्सला शास्त्रीय साम्यवादाचा जनक म्हणून ओळखल्या जाते. १९ व्या शतकात भांडवलशाही फोफावत होती. त्याचवेळी भांडवलशाहीचे तोटे—आर्थिक विषमता, बेकारी, गरीबी, पिळवणूक यांचे थैमान चालू होते. अशा परिस्थितीत एक नविन प्रभावशाली समाजरचना निर्माण होणे आवश्यक आहे असे अनेक विचारवतांना वाटत होते. या परिस्थितीत समाजवादी समाजरचना अनिवार्य आहे व ती विशिष्ट पध्दतीने नियमानूसार स्थापन होईल असे तर्कसंगत विचार मांडून ते पटवून देण्याचे कार्य कार्ल मार्क्सनी केले.

**भांडवलशाही अर्थव्यवस्था:—**

कार्ल मार्क्सच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेत दोन प्रमुख वर्ग असतात. १) भांडवलदार वर्ग २) कामगार वर्ग. उत्पादनाची सर्व साधने भांडवलदारांच्या मालकीची असतात. तर कामगारांजवळ त्यांच्या श्रमा व्यतिरिक्त काहीचे नसते. त्यामुळे ते आपल्या श्रमाची विक्री भांडवलदारांकडे करतात. भांडवलदार वर्ग कामगार

वर्गाची पिळवणूक करतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदाराचे स्थान मध्यवर्ती, महत्वपूर्ण असते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी कार्ल मार्क्सने साधने मालोत्पादन (Simple Commodity Production) व भांडवलशाही मालोत्पादन (Capitalistic Commodity Production) असा भेद केला आहे. साधे मालोत्पादन म्हणजे कामगारांकडून स्वत:च्या मालकीच्या भांडवली वस्तूच्या सहायाने व स्वतंत्र उत्पादक म्हणून केले जाणारे मालोत्पादन होय. भांडवलशाही मालोत्पादन प्रत्यक्ष राबणारा कामगार उत्पादन साधनांचा मालक नसतो. भांडवली उत्पादन साधने कामगारांच्या मालकीची नसल्यामुळे व त्या वस्तूंशिवाय उत्पादन होऊच शकत नसल्यामुळे आपली श्रमशक्ती (Labour Power) भांडवलदारांना विकणे भाग पडते. भांडवली साधनांची मालकी कामगारांच्या हातात नसणे आणि त्यामुळे कामगाराला आपली श्रमशक्ती विकावी लागणे म्हणजेच पर्यायाने भांडवलदारांकरीता राबावे लागणे हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे लक्षण आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत श्रमशक्तीची खरेदी—विक्री अपरिहार्यपणे केली जाते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कामगार हा श्रमशक्तीचा विक्रेता तर भांडवलदार हा श्रमशक्तीचा ग्राहक असतो.

**अतिरिक्त मूल्य आणि कामगारांचे शोषण:—**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदार वर्ग हा लहान असला तरी तो विशाल अशा कामगार वर्गाला काम देत असतो. कार्ल मार्क्सच्या अतिरिक्त मूल्य सिध्दांतानूसार सर्व प्रकारचे उत्पादन हे कामगार वर्गच तयार करीत असतात. कामगार हाच उत्पादनाचा एकमेव घटक आहे. परंतु कामगार जेवढया मूल्याचे उत्पादन करतात त्यापेक्षा कमी मूल्य कामगारांना वेतनाच्या स्वरूपात मिळते. उदा. एक कामगार ८ तास काम करतो. म्हणजे त्याच्या श्रम उत्पादनाचे मूल्य ८ तास श्रमाबरोबर आहे. जर कामगाराला केवळ ६ तासांच्या श्रमाइतकेच वेतन मिळत असेल तर बाकीच्या दोन तासांत जे उत्पादन करतो ते अतिरिक्त श्रमाचे मूल्य असते. हे मूल्य भांडवलदारांकडे जाते. समजा कामगार ८ तास काम करून १०० रू. मूल्याचे उत्पादन करतो, परंतु त्या कामगाराला ७० रू. वेतन स्वरूपात दिल्या जाते. हयाचा अर्थ हया ठिकाण १०० रू. — ७० रू. = ३० रू. हे अतिरिक्त मूल्य आहे. हे अतिरिक्त मूल्य भांडवलदार स्वत:च्या खिशात टाकतो. अशाप्रकारे भांडवलदार अतिरिक्त मूल्य निर्माण करून कामगारांचे शोषण करीत असतो. कार्ल मार्क्सच्या मते अतिरिक्त मूल्य म्हणजेच भांडवलदारांचा नफा होय. जेवढे अतिरिक्त मूल्य जास्त तेवढाच भांडवलदारांना नफा जास्त मिळतो. म्हणून अतिरिक्त मूल्य निर्माण करण्यासाठी भांडवलदारांना अधिकाधिक शोषण करणे आवश्यक असते. मार्क्सच्या मते भांडवलदार अतिरिक्त मूल्य निर्मितीसाठी पुढील पध्दतींचा अवलंब करतात.

१) कामाचे तास वाढवून — कामाचे तास वाढवून कामगारांकडून पूर्वीपेक्षा जास्त काम करवून घेण्यात येते, परंतु त्यांच्या वेतनात मात्र वाढ करण्यात येत नाही. परिणामत: पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात अतिरिक्त मूल्याची निर्मिती होते. आणि कामगारांच्या शोषणात वाढ होते.

२) वेतनात घट करून — कामगारांचे कामाचे तास पूर्वीप्रमाणेच ठेवून त्यांच्या वेतनात घट केल्यास अतिरिक्त मूल्याची निर्मिती होते व कामगारांचे शोषण वाढत जाते.

३) कामगारांची उत्पादकता वाढवून— या पध्दतीत आधुनिक तंत्राचा उत्पादन कार्यात वापर करून कामगारांची उत्पादकता वाढविली जाते. वेतन दर स्थिर ठेवून एकूण उत्पादनात वाढ घडून आल्यामुळे होणारी निव्वळ वाढ म्हणजे भांडवलदारांचे अतिरिक्त मूल्य किंवा नफा होय.

**भांडवल संचयाव्दारे आर्थिक विकास:—**

कार्ल मार्क्सच्या मते अतिरिक्त मूल्यांमूळे भांडवल संचय होत असतो. जेवढे अतिरिक्त मूल्य जास्त तेवढा भांडवल संचय जास्त होतो. हया भांडवल संचयामुळे अर्थव्यवस्थेचा विकास होण्यास मदत होते. आर्थिक विकासासाठी केवळ उपभोग आवश्यक नसून भांडवल संचय होणे आवश्यक आहे हे मार्क्सने दाखवून दिले. जसजसा भांडवल संचय वाढत जातो तसतसा भांडवलदारांचा नफा वाढत जातो. भांडवलदार वर्ग अतिरिक्त मूल्यातून भांडवल संचय करतात तेव्हाच विकासाच्या प्रक्रियेला गती मिळते. जसजशी भांडवल संचयात वाढ होते तसतशी अधिक उत्पादन करण्यासाठी कामगारांची मागणी वाढते. त्यामुळे कामगरांचा वेतन दर वाढतो. वेतनाचा दर वाढल्यामुळे भांडवलदारांच्या नफ्यात घट होते. म्हणून भांडवलदार वर्ग वेतन दर निर्वाह पातळी इतकाच ठेवण्याचा प्रयत्न करतो. यासाठी उत्पादन कार्यात कामगारांपेक्षा आधुनिक तंत्रज्ञ व यंत्रसामुग्रीचा उपयोग केला जातो. त्यामुळे कामगारांच्या उत्पादन क्षमतेत वाढ होते. पूर्वीच्या उत्पादनासाठी आता कमी कामगारांची गरज लागते. त्यामुळे कामगारांच्या बेकारीत वाढ होत जाते. त्याचवेळी लोकसंख्या वाढत असल्यामुळे कामगारांच्या बेकारीत आणखी भर पडते. कामगारांच्या या वाढत्या बेकारीला मार्क्सने कामगारांची राखिव सेना (Resereved Armay of Labur) असे म्हटले आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत तांत्रिक प्रगती होऊन कामगारांऐवजी यंत्राचा वापर करण्याची प्रवृत्ती आढळते. हया प्रवृत्तीमुळे कामगार बेकार होतात. रोजगार नसल्यामुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण होतो. कामगारवर्ग एकत्र येवून कामगार संघटना स्थापन करतात व देशात क्रांती घडवून आणतात असे मार्क्सचे मत आहे.

**नफ्याचा घटता दर:—**

नफा मिळविण्याच्या प्रेरणेतून भांडवलदार वर्ग उत्पादन कार्यात मोठया प्रमाणात आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर करतात. आधूनिक उत्पादन तंत्राच्या वापरामुळे कामगारांच्या बेकारीत वाढ होते. भांडवलदार वर्ग अतिरिक्त मूल्य (नफा) वाढविण्याच्या हव्यासापायी सातत्याने नवनव्या तंत्राचा वापर करून कामगारांच्या बेकारीत वाढ करीत राहतो. वाढत्या बेकारीमुळे कामगार कमी वेतन दरावर काम करण्यास तयार होतात. वेतन दर कमी झाल्याने कामगारांची क्रयशक्ती कमी होते. कामगारांची क्रयशक्ती कमी झाल्यामुळे अर्थव्यस्थेत निर्माण झालेल्या उत्पादनाला पूरेशी मागणी निर्माण होत नाही. अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची स्थिती निर्माण होते. या परिस्थितीत भांडवलदारांना एकतर वस्तूंच्या किंमती कमी कराव्या लागतील,

किंवा कामगारांना वेतन वाढवून द्यावे लागेल. या परिस्थितीत भांडवलदारांच्या नफ्यात घट होवू लागते. नफ्याचा दर घटल्यामुळे भांडवलदार वर्गाची पुनर्गुंतवणुकीची प्रेरणा नष्ट होते. आणि आर्थिक विकासाला आळा बसतो.

**भांडवलशाहीचा अंत:—**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नफ्याचा दर घटत असल्यास भांडवलदारांना आपले उत्पादन कार्य बंद करावे लागते. नफा हा किंमतीच्या माध्यमातून मिळत असतो. आधुनिक तंत्राचा वापर मोठया प्रमाणात होवू लागल्याने कामगारांमध्ये बेकारी निर्माण होते. कामगारांची क्रयशक्ती कमी होते. परिणामी वस्तूची मागणी कमी होते. आपल्या मालाला मागणी निर्माण व्हावी म्हणून भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदारांमध्ये वस्तूंची किंमत कमी करण्याची स्पर्धा सुरू होते. भांडवलदार वर्गातील स्पर्धेमुळे वस्तूंच्या किंमती इतक्याकमी होतात की नफा मिळेनासा होतो. या स्पर्धेत छोटे भांडवलदार नष्ट होतात. जे भांडवलदार स्पर्धेत टिकू शकत नाहीत ते सर्व शेवटी कामगारांच्या रांगेत येऊन बसतात. काही मोठया भांडवलदारांकडे भांडवलाचे केंद्रीकरण होते. यांत्रिकीकरण व भांडवलाचे केंद्रीकरण अधिक वेगाने होत जाते. या सर्व प्रक्रियेत कामगारांची अवस्था अतिशय दयनीय होत जाते. एका टोकाला प्रचंड संपत्तीचे केंद्रीकरण तर दुसऱ्या टोकाला दारिद्रय, गुलामगिरी, अज्ञान, निर्दयता व मानसिक दुरावस्था असे चित्र निर्माण होते. समाजात दोन परस्पर विरोधी गट निर्माण होतात. ते म्हणजे अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनावर मालकी असणारा भांडवलदार वर्ग व दुसरीकडे ज्याचे आर्थिक शोषण होत आहे असा कामगार वर्ग असे दोन वर्ग निर्माण होतात. ह्या दोन स्वतंत्र वर्गात वर्गसंघर्ष (Class-Conflict) किंवा वर्गकलह निर्माण होतो. आपल्या स्थितीत सुधारणा झाली पाहिजे अशी जाणीव निर्माण होवून कामगार वर्ग जागृत बनतो. भांडवलदार वर्गाविरूध्द अनेक मार्गाने संघर्ष करण्यासाठी प्रयत्न करतो. शेवटी या संघर्षातून क्रांती घडून येते. या क्रांतीतून एका नविन आर्थिक प्रणालीचा म्हणजे समाजवादाचा उदय होतो. मार्क्सच्या मते भांडवल संचय व नफा मिळविण्याच्या प्रक्रियेतच भांडवलदार आपली दफन भूमी स्वत: तयार करतात. कारण राजकीय क्रांती होवून कामगार वर्गाचा (Proletariat) विजय व त्यांची सत्ता स्थापन होणे हे केवळ अटळ आहे! कामगार वर्गाची हुकुमशाही सत्ता स्थापन होईल.

**समारोप:—**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक प्रगतीबरोबरच भांडवलाचे केंद्रीकरण मोठया प्रमाणावर होवून आर्थिक एकाधिकारशाही अस्तित्वात येते असे मार्क्स यांनी मांडलेले मत आजच्या परिस्थितीत भांडवलशाही राष्ट्रामधल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जागतिक बाजारपेठेमध्ये वाढत असलेले महत्व पाहता बरोबर वाटते. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी भांडवलवादाला अंतिम सत्य मानून आपले आर्थिक विचार मांडले. भांडवलशाहीनंतर अर्थव्यवस्थेत काही बदल घडून येणे शक्य आहे, याचा त्यांनी अजिबात विचार केला नाही. मार्क्स यांनी मात्र भांडवलवादानंतरही समाज अपरिहार्य आहे असे मत मांडले व भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न

केला. भांडवलशाही विकासाशी संबंधीतच समस्यांचा प्रामुख्याने मार्क्स यांनी विचार केला आहे. मार्क्सने अविकसित देशांबद्दल विचार केला नाही. तसेच अति लोकसंख्या असलेल्या अल्पविकसित देशांना हा सिध्दांत लागू होत नाही. असे असले तरी मार्क्सच्या विश्लेषणात कामगारांचे शोषण, भांडवलाचे केंद्रीकरण, वेतन दरात घट, दारिद्रय, उत्पन्न व संपत्ती बाबत विषमता, स्थायी बेरोजगारीच्या राखीव फौजचे अस्तित्व, न्यून उपभोग व वर्गसंघर्ष इत्यादी अंशी काही तत्वे विद्यमान आहेत की जी अल्पविकसित देशात सुध्दा अनुभवास येतात.

**संदर्भसूची:—**

१) प्रा. व.गो. सहस्त्रबुध्दे — अर्थशास्त्राचा विकास, (१९६१), अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे २.

२) सुहास परांजपे — दास कॅपिटल, (भांडवल), (१९८७), शंकर ब्रम्हो समाजविज्ञान ग्रंथालय पुणे ४.

३) डॉ. कुरूलकर/एकताटे — विकासाचे अर्थशास्त्र, (१९९१), विद्या प्रकाशन, नागपूर.

४) डॉ. जी.एन. झामरे— भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, (२०१५), पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

५) डॉ. वसुधा पुरोहीत — आर्थिक विकास व नियोजन आणि सांख्यिकीय पध्दती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.